# राजस्वाचा अर्थ, स्वरुप व व्याप्ती

# Public Finance Meaning, Nature and Scope

## प्रस्तावना

**(Introduction)**

राजस्व किंवा सार्वजनिक आयव्यय हा अर्थशास्त्राचा एक महत्वाचा भाग आहे. पूर्वी राज्याचे कार्यक्षेत्र अत्यंत मर्यादित होते. परंतु अलीकडच्या काळात कल्याणकारी राज्याची कल्पना सर्वत्र मान्य झाल्यामुळे सरकारच्या कार्यांची संख्या सतत वाढतच आहे. या कार्यांवर सरकारला खर्च ही करावा लागतो. हा खर्च भागविण्यासाठी सरकारला विविध मार्गांचा अवलंब करुन उत्पन्न मिळवावे लागते. सरकारचा खर्च आणि मिळविण्यात येणारे उत्पन्न याचा समाजाच्या आर्थिक जिवनावर परिणाम होतो. केवळ उत्पन्न मिळवणे हे सरकारचे उद्दिष्ट नसून त्याद्वारे सामाजिक न्याय प्रस्थापित करणे, आर्थिक स्थैर्य टिकविणे इत्यादी उद्दिष्ट्ये पूर्ण करता येतात. अशा रितीने सार्वजनिक आयव्ययाचा समाजाच्या आर्थिक जीवनाशी निकटचा संबंध येतो. म्हणूनच सार्वजनिक आयव्ययाचे विवेचन अर्थशास्त्रात करता येते.

## सार्वजनिक आयव्ययाचा अर्थ

**(Meaning of Public Finance)**

सार्वजनिक आयव्यय म्हणजे सरकारला मिळणारे उत्पन्न व सरकारचा खर्च असा सरळ अर्थ लावता येतो.

सार्वजनिक आयव्ययाच्या (राजस्वाच्या) अनेक अर्थशास्त्रज्ञांनी व्याख्या केलेल्या आहेत. त्यातील प्रमुख व्याख्या पुढील प्रमाणे,

१) डॉ. डाल्टनच्या मते, “सार्वजनिक आयव्यय हा विषय अर्थशास्त्र व राज्यशास्त्र यांच्या सीमारेषेवर असलेल्या अनेक विषयांपैकी एक आहे. तो सार्वजनिक सत्तांचे उत्पन्न व खर्च ह्या दोहोंचे परस्परांशी समायोजन यांच्याशी संबंधीत आहे.”

(“Public Finance deals with the income and expenditure of public authorities and with the manner in which one is adjusted with the other.” Dr. Dalton)

२) प्रो. फिंडले शिरासच्या मते, “राजस्व हे सार्वजनिक सत्तांच्या उत्पन्न मिळविण्याच्या व खर्च करण्याच्या पद्धतींशी निगडीत असलेले शास्त्र होय.”

(“Public Finance is the science which is concerned with the manner in which the public authorities obtain their income and spend it.” Findlay Shirras)

३) प्रो. पी. ई. टेलर यांच्या मते, “सरकार या संस्थेत संघटित झालेल्या जनेतच्या अर्थकारणाचे विवेचन राजस्व करते. म्हणजे राजस्व केवळ सरकारच्याच अर्थकारणाचा विचार करते. सरकारच्या अर्थकारणात सरकारी पैसा गोळा करण्याच्या व तो खर्च करण्याच्या क्रियांचा समावेश होतो.”

(“Public Finance deals with the finances of the public as an organized group under the institution of Government. The finances of the government include the raising and disbursement of government funds.” P.E. Taylor)

वरील सर्व व्याख्या पाहिल्यास असे दिसून येते की, राजस्व हे सार्वजनिक सत्तांच्या अर्थकारणांचा अभ्यास करणारे शास्त्र होय. यात सार्वजनिक सत्ता आपले उत्पन्न व खर्च यांचा मेळ कसा बसवितात याचा विचार केला जातो.

## सार्वजनिक आयव्ययाची व्याप्ती

**(Scope of Public Finance)**

सार्वजनिक आयव्ययाची व्याप्ती ही सरकारच्या कार्याच्या व्याप्तीवरुन निश्चित होते. सार्वजनिक सत्तांचा व्याप जेवढा जास्त तेवढी सार्वजनिक आयव्ययाची व्याप्ती जास्त. सार्वजनिक आयव्ययाचा अभ्यास विषय प्रामुख्याने पुढील पाच विभागांमध्ये विभागला जातो. हे पाचही विभाग वेगवेगळे असले तरी परस्परांशी संबंधीत आहेत. या विभागाविषयाी थोडक्यात माहिती पाहू.

| | |
|---|---|
| १) सार्वजनिक उत्पन्न | (Public Revenue) |
| २) सार्वजनिक खर्च | (Public Expenditure) |
| ३) सार्वजनिक कर्ज | (Public Debts) |
| ४) वित्तीय प्रशासन | (Financial Administration) |
| ५) संघीय वित्तव्यवस्था | (Federal Finance) |

### १) सार्वजनिक उत्पन्न

**(Public Revenue)**

या विभागात सरकारच्या उत्पन्नाचे स्त्रोत कोणते आहेत याचा विचार करण्यात येतो. सरकारच्या उत्पन्नाच्या विविध साधनांचे वर्गीकरण करुन त्यांच्यातील परस्पर संबंधाचे विवेचन या विभागात केले जाते. या सर्व साधनांतील अत्यंत महत्वाचे साधन म्हणजे कर. या करांची तत्वे, त्यांचे वर्गीकरण, त्यांचे परिणाम ह्यांचा विचार करण्यात येतो.

## २) सार्वजनिक खर्च (व्यय)

**(Public Expenditure)**

या विभागात सरकार जनतेच्या कल्याणाची जबाबदारी पूर्ण करण्याच्या हेतूने जो विविध प्रकारचा खर्च करते. त्या खर्चाशी निगडीत सिद्धांताचा विचार केला जातो. सरकारच्या कार्यात दिवसेंदिवस सतत वाढ होत आहे. त्यामुळे राजस्वात सार्वजनिक व्ययाचे महत्व देखील वाढत आहे. सार्वजनिक व्ययाचे अर्थव्यवस्थेवर जे परिणाम होतात त्याचे व सार्वजनिक खर्चाचे वर्गीकरण याचा विचार या विभागात केला जातो.

## ३) सार्वजनिक कर्ज

**(Public Debts)**

स्रकारला जनतेच्या कल्याणाच्या जबाबदाऱ्या पार पाडत असतांना मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागतो. हा खर्च चालविण्याकरिता करांद्वारे मिळणारे उत्पन्न व इतर मार्गांनी मिळणारे उत्पन्न कमी पडते. म्हणून सरकारला कर्ज काढावे लागते. या विभागात कर्जाचे विविध प्रकार व ते कर्ज फेडण्याच्या पद्धतींचे विवेचन केले जाते. ह्या कर्जाचे समाजावर काय परिणाम होतात ह्या सर्वांचा विचार या विभागात करण्यात येतो.

## ४) वित्तीय प्रशासन

**(Financial Administration)**

सरकारचे उत्पन्न व खर्च यांचा मेळ प्रामुख्याने अंदाजपत्रकात (Budget) घातला जातो. ह्या विभागात अंदाजपत्रक कसे तयार करतात, त्याची उद्दिष्ट्ये कोणती व त्याचे वेगवेगळ्या परिस्थितीत कोणते परिणाम होतात याचे विवेचन

करण्यात येते. सरकारच्या राजकोषीय नितीचे एक साधन म्हणून अंदाजपत्रकाचा कशा रितीने उपयोग करुन घेता येईल. याचाही विचार य विभागात केला जातो.

### ५) संघीय वित्त व्यवस्था

**(Federal Finance)**

या संघीय वित्त व्यवस्थेअंतर्गत केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्यामध्ये वित्तीय साधने आणि जबाबदाऱ्या यांचे विभाजन करण्यात आले आहे. केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्यात वित्तीय साधनांची वाटणी कशी केली जाते, या वाटणीचे नियम व समायोजनाच्या विविध पद्धती कोणत्या इत्यादींचा या विभागात विचार केला जातो.

## सार्वजनिक आयव्यय व खाजगी आयव्यय

**(Public Finance and Private Finance)**

सार्वजनिक आयव्ययाचे स्वरुप अधिक स्पष्ट करण्यासाठी त्या आयव्ययाची तुलना खाजगी आयव्ययाशी केली जाते. या तुलनेमुळे सार्वजनिक आयव्ययाचे आकलन करण्याला अधिक मदत होते. सार्वजनिक आयव्यय हा खाजगी आयव्ययाच्या विरुद्धार्थी असल्यामुळे दोहोतील साम्य व भेद महत्वाचा ठरतो. या दोहोतील साम्य व भेद पुढीलप्रमाणे.

## सार्वजनिक आयव्यय व खाजगी आयव्यय यातील साम्य

**(Similarities between Public Finance and Private Finance)**

### १) उत्पन्न व खर्च यांचा संबंध

व्यक्ती व सरकार या दोघांनाही उत्पन्न व खर्च यांचा मेळ बसवावा लागतो. विविध प्रकारच्या आर्थिक प्रश्नांची सोडवणूक कशी करायची या गोष्टी

व्यक्तीला जशा विचारात घ्याव्या लागतात. तशा सरकारलाही विचारात घ्याव्या लागतात. कारण व्यक्ती व सरकार या दोघांनाही अमर्यादित गरजा व मर्यादित साधने यांचा मेळ घालूनच आपले उद्दिष्ट पूर्ण करावे लागते.

### २) महत्तम समाधानाची प्राप्ती

व्यक्ती आणि सरकार या दोघांचाही उद्देश महत्तम समाधान प्राप्त करणे हाच असतो. दोघेही आपले उत्पन्न व खर्च यांचा असा मेळ घालतात की जेणेकरुन त्यांना जास्तीत जास्त समाधान प्राप्त होईल.

### ३) कर्ज घेणे

व्यक्ती व सरकार या दोघांनाही खर्चापेक्षा उत्पन्न कमी पडल्यास कर्ज घ्यावे लागते व दोघांनाही घेतलेल्या कर्जाची परतफेड करावी लागते.

### ४) साधनांची दुर्मिळता

व्यक्तीच्या तसेच सरकारच्या दृष्टिनेदेखिल साध्यांच्या मानाने साधने मर्यादित असतात. व्यक्तीला तसेच सरकारला आपल्या अमर्यादित साध्यांचा मर्यादित साधनांशी मेळ घालावा लागतो.

## सार्वजनिक आयव्यय व खाजगी आयव्यय यातील फरक

**(Difference between Public Finance and Private Finance)**

### १) उत्पन्न व खर्च यांचे समायोजन

व्यक्ती आपले उत्पन्न पाहून खर्च करित असते. व्यक्ती आपल्या उत्पन्नानुसार खर्चात बदल करीत असते. व्यक्तीला अंथरुण पाहून पाय पसरावे लागतात.

परंतु सरकारला हे लागू होत नाही. सरकार प्रथम आपल्याला किती खर्च करायचा हे निश्चित करते आणि या खर्चाशी उत्पन्नाचा मेळ बसविण्याचा प्रयत्न करते.

**२) उत्पन्न मिळविण्याच्या साधनातील भिन्नता**

व्यक्तीची उत्पन्न मिळविण्याची साधने मर्यादित जास्त असतात. परंतु सरकारची उत्पन्न मिळविण्याची साधने बरीच जास्त असतात. सरकारची नाणे बाजारात विशाल पत असते. विदेशातून कर्ज उभारुन, करांचे दर वाढवून, पत्रचलन छापून आपल्या उत्पन्नात वाढ करु शकते. सरकारप्रमाणे व्यक्ती वरील मार्गांचा अवलंब करु शकत नाही. तसेच व्यक्तीचा खर्च हा मर्यादित असतो तर सरकारचा खर्च प्रचंड प्रमाणात असतो.

**३) अंदाजपत्रकाचे स्वरुप**

व्यक्तीच्या दृष्टीकोनातून विचार केल्यास व्यक्तीचा खर्च हा नेहमी त्याच्या उत्पन्नापेक्षा कमी असला पाहिजे. उत्पन्नातून खर्च वजा करता उरलेल्या उत्पन्नाची भविष्यकाळासाठी बचत करणे योग्य असते. परंतु सरकारच्या दृष्टीने ही गोष्ट योग्य असतेच असे नाही. सरकारचे अंदाजपत्रक संतुलितच असावे असा आग्रहही नसतो. बऱ्याचदा तुटीचे अंदाजपत्रक आवश्यक ठरते असे काही अर्थशास्त्रज्ञांचे मत आहे. प्रा. केन्स यांनी तुटीच्या अंदाजपत्रकाचा स्विकार केला आहे.

**४) आयव्ययाची गुप्तता**

व्यक्ती आपले उत्पन्न, आपला खर्च तसेच कर्ज या संबंधात गुप्तता ठेवण्याचा प्रयत्न करीत असतो. यावर व्यक्तीची समाजातील पत अवलंबून असते. आपले कर्ज, आपले दुय्यम उत्पन्नाचे स्त्रोत कुणालाही कळू नये याचा

प्रयत्न करीत असतो. या उलट सरकारची आयव्ययाची स्थिती आहे. सरकारचे उत्पन्न, खर्च, कर्ज इत्यादी हे अंदाजपत्रकाद्वारे जनतेसमोर मांडले जातात. त्यात कोणत्याही प्रकारची गुप्तता नसते.

### ५) दृष्टीकोनातील भिन्नता

खाजगी वित्त आणि सार्वजनिक वित्त यांच्या उद्दिष्टांमध्ये भिन्नता दिसून येते. व्यक्तीचा दृष्टीकोन हा सार्वजनिक दृष्टीकोनापेक्षा संकुचित व अल्पकालीन असतो. डाल्टनच्या मते याचे कारण व्यक्ती वर्तमान काळापेक्षा अनिश्चित असलेल्या भविष्यकाळाला कमी महत्व देते. याउलट सरकार भविष्यकाळ व भावी पिढ्यांकडे दुर्लक्ष करु शकत नाही.

### ६) समसीमान्त उपयोगिता नियम

व्यक्ती आपला खर्च समसीमान्त उपयोगिता नियमाला अनुसरुन करते. व्यक्ती आपला खर्च अशा रितीने विविध गरजांवर विभागते की जेणेकरुन त्या सर्व गरजांच्या तृप्तीतून मिळणारी सीमान्त उपयोगिता समान राहील व यातूनच व्यक्तीला महत्तम समाधान प्राप्त होते.

परंतु सरकारला असे करता येत नाही. उपयोगिता ही व्यक्तीनिष्ठ संकल्पना आहे. सरकारच्या बाबतीत ती तंतोतंत लागू करता येत नाही. बऱ्याचदा काही खर्च अनावश्यक आहे हे लक्षात आले तरी ते सरकारला करणे भाग पडते. अशा परिस्थितीत महत्तम समाधानाच्या नियमाचे पालन कसे होणार.

### ७) वित्तामधील लवचिकता

खाजगी वित्तापेक्षा सार्वजनिक वित्त जास्त लवचिक असते. खाजगी व्यक्ती अल्पकाळात आपल्या उत्पन्नात व खर्चात फारसा बदल करु शकत नाही. परंतु सरकार आपल्या वित्तात मोठ्या प्रमाणात बदल करु शकते. सरकार

जनतेवर नवीन कर आकारुन जुन्या करांच्या दरात वाढ करवून आपल्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणात वाढ करु शकते.

## सार्वजनिक वस्तू आणि खाजगी वस्तू

**(Public Goods and Private Goods)**

मानवाच्या गरजा या अनंत असतात. मानव आपल्या गरजा भागविण्यासाठी सार्वजनिक वस्तूबरोबरच खाजगी वस्तूंचादेखील उपभोग घेत असतो. या खाजगी वस्तू ज्या मानव आपल्या वैयक्तिक उत्पन्नातून पूर्ण करीत असतो. या वस्तू वैयक्तिक उपभोगाकरिता निवडल्या जातात. त्यांना खाजगी वस्तू (Private Goods) असे म्हणतात. या वस्तू उपभोक्त्यांना बाजारातून खरेदी कराव्या लागतात. या वस्तूंसाठी अंदाजपत्रकीय तरतूदीची गरज नसते. थोडक्यात, खाजगी वस्तू म्हणजे अशा वस्तू ज्या खाजगी गरजांची पूर्तता करतात.

या उलट सार्वजनिक गरजांची तरतूद अंदाजपत्रकात केलेली असते. या गरजांची पूर्तता ज्या वस्तूद्वारे केली जाते. त्यांना सार्वजनिक वस्तू असे म्हणतात. सोप्या शब्दात सांगावयाचे झाल्यास संपूर्ण समाजाला सामुहिक उपभोगासाठी ज्या वस्तू उपलब्ध करुन दिल्या जातात अशा वस्तूंना सार्वजनिक वस्तू (Public Goods) असे म्हणतात. उदा. सार्वजनिक आरोग्य सेवा, सार्वजनिक उद्याने, सरंक्षण सेवा, रस्ते, रस्त्यांवरील दिवे, इत्यादींचा समावेश होतो. या सेवासाठी लागणारा खर्च सरकार करते.

## खाजगी वस्तू व सार्वजनिक वस्तू यातील फरक

**(Difference Between Private Goods and Public Goods)**

| अ.क्र. | खाजगी वस्तू | सार्वजनिक वस्तू |
|---|---|---|
| १ | खाजगी वस्तू या खाजगी गरजांची पूर्तता करतात. | सार्वजनिक वस्तू या संपूर्ण समाजाच्या गरजांची पूर्तता करतात. |
| २ | या वस्तू उपभोक्त्याला बाजारपेठेतून खरेदी कराव्या लागतात. | सार्वजनिक वस्तू या सरकारद्वारे मोफत दिल्या जातात. |
| ३ | खाजगी वस्तूंच्या फायद्याविषयी व्यक्तीला माहिती असते. | सार्वजनिक वस्तूंच्या फायद्याविषयी माहिती नसते. |
| ४ | खाजगी वस्तूंच्या खर्चाबरोबर लगेच फायदा मिळतो | सार्वजनिक वस्तूंच्या खर्चाबरोबर लगेच फायदा मिळत नाही |
| ५ | खाजगी वस्तूंवर खर्च करणारा व लाभ प्राप्त करणारा व्यक्ती एकच असतो | सार्वजनिक वस्तूंवर खर्च करणारा वेगळा व लाभ प्राप्त करणारा वेगळा असतो. |

## राजस्वाचे महत्व

**(Importance of Public Finance)**

पूर्वी सरकारची कार्ये अत्यंत मर्यादित होती. ॲडम स्मिथच्या मते, केवळ सुरक्षितता, शिक्षण व सार्वजनिक निर्माण एवढीच कार्ये सरकारने करण्याजोगी होती. परंपरावादी अर्थशास्त्रज्ञांची अशी भूमिका होती की, 'किमान हस्तक्षेप करणारे सरकार सर्वोत्तम' निर्हस्तक्षेप धोरणाचे ते कट्टर समर्थक होते.

जर्मन अर्थशास्त्रज्ञ वॅगनरने 'राज्याच्या वाढत्या कार्याचा नियम' मांडला व यानंतर मात्र राज्याच्या दृष्टीकोनात अमूलाग्र बदल झाला आहे. याचाच परिणाम म्हणून कल्याणकारी राज्याची संकल्पना व त्यासोबतच समाजवादी समाजरचना उदयास आली. या सर्वांचा परिणाम राज्याच्या कार्याचा विस्तार होवू लागला. त्यामुळेच राजस्वाचे महत्व दिवसेंदिवस वाढू लागले. राज्याच्या कार्याचा भार वाढू लागल्यामुळे त्यांच्या अंमलबजावणीसाठी जास्त उत्पन्नाची आवश्यकता वाटू लागली. सरकारला मिळालेले उत्पन्न सरकारने विविध कार्यांवर खर्च केल्यामुळे त्याचा परिणाम फक्त उत्पादनाच्या रचनेवर व उत्पन्नाच्या वितरणावर होत नसून उत्पादनाची व रोजगारीची पातळी यावर सुद्धा होतो. या कारणामुळे राजस्वाचे महत्व आधिकच वाढले. म्हणूनच जेम्स विल्सन म्हणतो, 'वित्त म्हणजे केवळ अंकगणित नव्हे; वित्त ही एक महान नीती आहे. सुदृढ वित्ताशिवाय सुदृढ सरकार नाही व सुदृढ सरकारशिवाय सुदृढ वित्त नाही.' सार्वजनिक विताद्वारे शिक्षण, आरोग्य, प्रशिक्षण, मार्गदर्शन या सारख्या मानव संसाधन विकासाच्या साधनांवर खर्च करण्यात येतो. त्यामुळे भविष्यकालीन पिढी सक्षम व कार्यकुशल निर्माण होऊन देशाच्या प्रगतीला हातभार लावत असते.

थोडक्यात, राजस्वाला आर्थिक विकासाची गती वाढविण्याकरिता, आर्थिक पिळवणूक थांबविण्याकरिता, सामाजिक सुरक्षितता व लोककल्याण साधण्याकरिता, अर्थव्यवस्थेत स्थैर्य आणण्याकरिता व बाह्य आक्रमणापासून देशाचे सरंक्षण करुन देशात शांतता ठेवण्याकरिता राजस्वाला अत्यंत महत्वपूर्ण अशी भूमिका पार पाडावी लागते.

## अपेक्षित प्रश्न

### दिर्घोत्तरी प्रश्न

१) राजस्वाची व्याख्या देऊन राजस्वाचे स्वरुप व व्याप्ती विषयी चर्चा करा.

२) राजस्व म्हणजे काय? ते सांगून राजस्वाचे महत्व स्पष्ट करा.

**लघुत्तरी प्रश्न**

१) राजस्व म्हणजे काय?

२) राजस्वाचे महत्व सांगा.

३) राजस्वाची व्याप्ती सांगा.